**मोटार अपघात प्रकरण २४४/२०१८**

**राणुबाई वि. अमोल व इतर**

**निशाणी क्रमांक – ३८**

**<u>साक्षीदाराची पुढील सरतपासणी मार्फत त्यांचे विधीज्ञ श्री.ए.ई.कराड यांच्यामार्फत शपथेवर सुरु</u>**

१. मी माझ्या साक्षीचे शपथपत्र् न्यायालयामध्ये दाखल केले आहे. त्यावर माझी सही आहे व लिहीलेला मजकूर बरोबर आहे. दिनांक ०५.१०.२०१८ च्या यादीसोबत मी गुन्हयाच्या प्राथमीक अहवालाची सत्यप्रत दाखल केली आहे. ती निशाणी क्र.३९ वर आहे. घटनास्थळ पंचनाम्याची सत्यप्रत निशाणी क्र.४० वर आहे. मरणोत्तर पंचनाम्याची सत्यप्रत निशाणी क्र.४१ वर आहे. शवतपासणी फॉर्मची सत्यप्रत निशाणी क्र.४२ वर आहे. शवविच्छेदन अहवालाची सत्यप्रत निशाणी क्र.४३ वर आहे. अपघातामधील वाहनाचे आरटीओ नोंदणी प्रमाणपत्राची प्रत निशाणी क्र.४४ वर आहे. अपघातामधील वाहनाच्या विमा पॉलीसीची प्रत निशाणी क्र.४५ वर आहे.

**<u>उलटतपासणी सामनेवाला क्र.१ व २ तर्फे श्री.ए.एम.के.पटेल विधीज्ञ यांच्यातर्फे</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, वादातील अपघात विलासच्या चुकीमुळे झाला. हे म्हणणे खरे नाही की, मोटारसायकल चालवित असताना विलास हा रस्त्यावरील दुभाजकाला जावून धडकला. हे म्हणणे खरे नाही की, विलास हा मोटारसायकलने दुभाजकाला धडकल्यामुळे तो आणि माझा मुलगा किसन जखमी झाले आणि मरण पावले. हे म्हणणे खरे नाही की, अपघात हा विलासच्या चुकीमुळे झाला होता आणि म्हणून त्याच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला. हे म्हणणे

खरे नाही की, अपघात हा विलासच्या चुकीमुळे झाला असल्यामुळे तशी नोंद पोलीसांनी गुन्हयाच्या प्राथमीक अहवालामध्ये घेतलेली आहे. पोलीसांनी विलासविरुध्द चुकीचा गुन्हा दाखल केला याविरुध्द आम्ही पोलीस स्टेशनला अर्ज केला होता पण पोलीसांनी काही कारवाई केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मृतक विलास आणि माझा मुलगा किसन हे त्यांच्या मृत्यूस स्वतः कारणीभूत आहेत. हे म्हणणे खरे नाही की,वादातील अपघातामध्ये टँकर क्रमांक MH-12-EQ-8421 चे चालक आणि मालक हे जबाबदार नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, नुकसानभरपाई मिळण्यासाठी मी माझ्या अर्जामध्ये आणि शपथपत्रामध्ये हे चुकीचे नमूद केले आहे की, वर नमूद टँकर पाठीमागून जोरात आला आणि त्यांनी विलास चालवित असलेल्या मोटारसायकलला धडक दिली. हे म्हणणे खरे नाही की, वर नमुद टँकरची सदर नमूद अपघातामध्ये कोणतीही चूक नाही. हे म्हणणे खरे नाही की, तो टँकर मी चुकीच्या पध्दतीने अपघातामध्ये गोवलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, नुकसानभरपाई मिळावी म्हणून मी सामनेवाला क्र.१ व २ यांच्याविरुध्द चुकीचे कथन केले आहे आणि त्यांच्याविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपासणी सामनेवाला क्र.३ तर्फे श्री.एस.व्ही.तापडीया विधीज्ञ यांच्यातर्फे**

३. माझे शिक्षण १०वी पर्यंत झालेले आहे. देवकरा या गावी माझी दीड एकर शेती आहे. मला माझ्या शेताचा सर्वे नंबर / गट नंबर माहीत नाही. मी सध्या लातूर येथे भाडयाच्या घरात राहतो. मला सिध्देश्वर आणि निळकंठ नावाची आणखी दोन मुले आहेत. ते देवकरा गावी असलेल्या माझ्या घरात राहतात. ते

दोघे माझी दीड एकर शेती बघतात आणि मजूरीचेही कामे करतात. अपघातानंतर मी माझ्या गावाकडे गेलो नाही. ज्यावेळी किसन पुण्याला होता त्यावेळी मी लातूरमध्ये राहत होतो. किसन हा पुण्यामध्ये भाडयाच्या खोलीमध्ये राहत होता. तो त्याचे खाणे–पिणे मेसमध्ये करत होता. त्याची भाडयाची खोली आणि मेस मध्ये महिन्याला त्याचा किती खर्च जात होता याबद्दल मला माहिती नाही. किसन पुण्याला असताना माझ्याकडून पैसे घेत नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, वादातील अपघात मी स्वतः पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या अर्जामध्ये आणि शपथपत्रामध्ये अपघात कसा घडला याबद्दल जी माहिती दिली आहे ती मला मिळालेल्या ऐकीव माहितीवरुन आहे. हे म्हणणे खरे नाही की,अर्जामध्ये दुरुस्ती करण्यापूर्वी मी त्यामध्ये असे लिहीले होते की, अपघाताच्या वेळी मृतक किसन हा मोटारसायकल चालवित होता. हे म्हणणे खरे आहे की, मला व्यक्तीशः हे माहित नाही की, अपघाताच्या वेळी मोटारसायकल विलास चालवत होता की किसन चालवत होता. अपघातामधील मोटारसायकल विलासच्या मालकीची होती. ती मोटारसायकल चालवण्याचा परवाना विलासकडे होता. मी याबाबत चौकशी केली नाही की, त्या मोटारसायकलचा विमा उतरवला होता की नाही. मी याबाबत माहीती घेतली नाही की विलासने मोटारसायकल चालवण्याचा परवाना कुठून घेतला होता. त्या वाहन चालवण्याच्या परवान्याची सत्यप्रत मिळवण्यासाठी मी प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, विलासकडे मोटारसायकल चालवण्याचा परवाना नव्हता. हे म्हणणे खरे नाही की,

मोटारसायकल चालवणा–याच्या चुकीमुळे अपघात घडला. मला याबाबत लक्षात नाही की, पोलीसांनी चुकीचा तपास केला अशी कोणती कारवाई मी न्यायालयामध्ये केली होती का. माझे आता ६७ वर्षे वय आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शपथपत्रामध्ये माझे वय ६० वर्षे असल्याचे नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला क्र.१ आणि २ यांच्याशी संगनमत करुन मी खोटा अर्ज केला आहे आणि खोटे शपथपत्र दिले आहे.

४. अर्जामध्ये मी माझा मुलगा खाजगी कंपनीमध्ये नोकरीवर होता याबद्दल माझ्या मुलाचे नियुक्तीपत्र दाखल केले नाही. मी माझ्या शपथपत्रामध्ये खोटे सांगीतले की, किसनला महिन्याला १२ हजार रुपये पगार होता. हे म्हणणे खरे नाही की, नुकसानभरपाई मिळण्यासाठी मी खोटा अर्ज केला आहे आणि आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,
स्वाक्षरीत/–
(आर.बी.भागवत)
जिल्हा न्यायाधीश क्र.२ तथा
सदस्य मोटार अपघात प्रा.,
लातूर

दिनांक :– ०६/०४/२०२६.